**प्रेस नोट** **दिनांक ०६/१०/२०२४**

दिनांक ०५/१०/२०२४ रोजी ००:३० वा.चे पुर्वी इसम श्री सचिन राममूरत कुर्मी, वय–४६ वर्षे यांचा यूनायटेड मिल क्र.०५ ची पाठिमागील बाजूच्या भिंतीजवळ, अनंत गणपत पवार लेन रस्ता, फिरोज फुड्स ॲन्ड फ्लेवरच्या दूकानाजवळ, घोडपदेव, मुंबई याठिकाणी कोणीतरी अज्ञात इसमाने अज्ञात कारणावरून धारदार व घातक शस्त्राने डोक्यावर, मानेजवळ, पोटावर व शरिराच्या इतर भागांवर वार करून व भोसकून खून केला, म्हणून फिर्यादी यांनी दिलेल्या जबाबावरून दिनांक ०५/१०/२०२४ रोजी भायखळा पोलीस ठाणे गु.र.क्र.६८२/२०२४, कलम १०३(१),६१ (२),२३८ भा.न्या.संहिता अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला.

सदरचा गुन्हा दाखल झाल्यानंतर तांत्रीक तपास करून तसेच गुप्त बातमीदारांच्या मदतीने नमुद गुन्ह्यातील पाहीजे आरोपीतांची नावे निष्पन्न करण्यात आली. तपासाच्या अनुशंगाने वेगवेगळी पथके तयार करुन आरोपींचा वेगवेगळ्या ठिकाणी शोध घेतला असता आरोपी नामे १) आनंदा अशोक काळे, उर्फ अन्या, वय: ३९ वर्षे, २) विजय ज्ञानेश्वर काकडे उर्फ पप्या, वय: ३४ वर्षे, व ३) प्रफुल्ल प्रविण पाटकर, वय – २६ वर्षे मिळुन आले.

नमुद गुन्हयाच्या अनुषंगाने गुन्हयातील आरोपी यांच्याकडे केलेल्या तपासामध्ये प्रथम दर्शनी पुर्व वैमनस्यातुन आरोपीतांनी खुन केल्याचे निष्पन्न झाल्याने त्यांना दिनांक ०६/१०/२०२४ रोजी अटक करण्यात आलेली असुन तिन्ही आरोपीतांना दि. ०६/१०/२०२४ रोजी मा.न्यायालायासमक्ष हजर केले असता मा.न्यायालयाने आरोपीतांना दि.१५/१०/२०२४ रोजी पर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. नमुद गुन्हयाचा पुढील तपास चालु आहे.

* * *